# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 7 | **Subject:** Marathi | **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 | **Paper:** Unit 1 | **Marks:**20

**(विभाग - १ : गद्य)**

**Q1) पुढील उताऱ्याचा आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा : (8)**

ध्येयावर डोळे होते. रोज पैसे मोजत होतो. गणेश चतुर्थी जवळ येत चालली. मजजवळ एक रुपया दोन आणे जमले होते. गौरी-गणपतीला नवीन कपडे करतात. आपल्या गावातील मुलांना त्यांचे आईबाप नवीन कपडे शिवतील; परंतु माझ्या भावास शिवील? माझ्या भावाला मी शिवून देईन.

मी शिंप्याकडे गेलो. माझ्या भावाच्या वयाचा एक मुलगा मी बरोबर घेऊन गेलो. त्याच्या अंगाचा कोट शिवावयास मी सांगितले. दोन वार कापड घेतले. अर्धा वार अस्तर घेतले. कोट तयार झाला. जवळच्या पैशांत सारा खर्च भागला. तो कोट हातात घेतला, तेव्हा माझे डोळे अश्रूंनी न्हाले होते.

मी घरी जाण्यास निघालो. मी ज्यांच्याकडे राहिलो होतो ते म्हणाले, "पावसापाण्याचा जाऊ नकोस. नदीनाल्यांना पूर आले असतील. पिसईचा पया, सोंडेघरचा पह्या यांना उतार नसेल, आमचे ऐक". मी कोणाचे ऐकले नाही. हृदयात प्रेमपूर आला होता, तो नदीनाल्यास थोडीच भीक घालणार!

नवीन कोट बांधून घेऊन मी निघालो. पंख असते तर एकदम उडून गेलो असतो. चालण्याचे श्रमच वाटत नव्हते. सुखस्वप्नात दंग होतो. आईला किती आनंद होईल, या कल्पनेत मी होतो. एक नानेटी माझ्या पायाजवळून उडी मारून गेली. नानेटी म्हणून एक सापाचा प्रकार आहे. तिचा हिरवा रंग असतो. नानेटी उड्या मारत जाते. मला जरा भीती वाटली. जपून चालू लागलो. पिसईचा पह्या दुथडी भरून वाहत होता. त्याच्या पाण्याला ओढ फार. काय करायचे? आईचे नाव घेतले व शिरलो पाण्यात. हातात काठी होती. पुढे काठी टाकावयाची व मग पाऊल टाकावयाचे. मी वाहून जाण्याच्या बेतात होतो; परंतु कसाबसा बाहेर आलो. इतर नदीनाल्यांना प्रेमाने भेटावयास जाणारा तो नाला ! तो मला कसा बुडवील? मी माझ्या भावास भेटावयास जात होतो. त्या नाल्याइतकाच उत्सुक होतो, धावपळ करीत होतो. त्या नाल्याप्रमाणेच मीही हृदय भरून घेऊन जात होतो.

TickMark.Ai

(1) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : (2)
- (1) .......................... नवीन कपडे करतात.
- (2) एक ................ माझ्या पायाजवळून उडी मारून गेली.

(2) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)
- (1) नवीन कोट पाहून श्यामचे डोळे कसे झाले?
- (2) श्यामचे मजजवळ किती पैसे जमले होते?

(3) (1) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : (1)
- (1) जुने x    (2) बाहेर x

(2) खालील शब्दांचे वचन बदला : (1)
- (1) आणे -    (2) कपडा -

(4) का ते लिहा. : (2)

श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांनी त्याला 'जाऊ नको' असे म्हटले.

**(विभाग - २ : पद्य)**

**Q2) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा : (6)**

गहू शाळवाचं मोती
काळ्या रानात सांडलं,
आणि माझ्या अंगणात

लख्ख चांदणं पडलं । १ ॥

काळ्याशार मातीतुनी
मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले
रानमेव्याची मिजास ||२||

दिला- घेतला वाढतो
रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण
गुण्यागोविंदानं खावा ||३||

(1) खालील आकृतिबंध पूर्ण करा : (2)

रानातला मेवा हे केल्याने वाढतो

(1) ............................

(2) ............................

(2) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)

(1) काळ्याशार मातीतून काय निघते?

(2) कवीच्या अंगणात काय डुले?

(3) खालील प्रश्नांची एक – दोन वाक्यांत उत्तरे लिहा : (2)

गहू शाळवाचं मोती कुठे सांडलं आणि त्याचा काय परिणाम झाला?

TickMark.Ai

**(विभाग - ३ : भाषाभ्यास)**

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा :** **(6)**

(1) खालील वाक्यातील नामाचे प्रकार ओळखून लिहा (1)

समाजसेवक दीन-दुखींच्या सेवेसाठी कार्य करतात.

(2) खालील वाक्यातील सर्वनामे ओळखा (1)

तुम्ही किती उशीर झाला?

(3) खालील वाक्यातील सर्वनामाचे प्रकार ओळखून लिहा (1)

या पुस्तकांमध्ये माहिती आहे.

(4) खालील वाक्यातील नामे ओळखा (1)

काही दिवसांनी हरी भेटेल.

(5) खालील वाक्यातील क्रियापद ओळखा (1)

आम्ही उद्या बाजारात जाऊ.

(6) खालील वाक्यातील विशेषण ओळखा (1)

मोठा घर बांधला.

All the Best